# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ A34077

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 25/01/2019

## परिपत्रक

**विषयः- प्रकल्पग्रस्त सदराखाली एकत्रित/गटासाठी वाटप करण्यात आलेल्या पीएपी भुखंडाचा विकास करण्यासाठी सह विकासकाची नेमणूक करणेबाबत..**

संदर्भ :- परिपत्रक क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग/१२२/२०१०, दिनांक २१.०९.२०१०

महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी ज्या शेतक-यांची जमीन संपादन करण्यात आली आहे अशा शेतक-यांना उपजिविकेचे साधन म्हणून १०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड/१५ टक्के परतावा भूखंड वैयक्तिक नावे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या एकत्रित गटाने स्थापन केलेल्या कंपनीला प्रचलित धोरणानुसार प्रकल्पग्रस्त सदराखाली भूखंडाचे वाटप करण्यात येते. अशा प्रकारे प्रकल्पग्रस्तांच्या एकत्रित गटाने स्थापन केलेल्या कंपनीला प्रकल्पग्रस्त सदराखाली पीएपी भूखंडाचे वाटप झालेनंतर अशा भूखंडाचा विकास करणे, भूखंड विकासासाठी वित्तीय सहाय्याची उपलब्धता करणे इत्यादी बाबत पीएपी खातेदारांचा अशिक्षीतपणा, पैशाचा अभाव, माहितीचा अभाव, बँका वित्तीय/संस्था यांचेपर्यंत पोहचण्याची अक्षमता, बाजारातील मंदी या सर्व बाबींचा विचार करता पीएपी सदराखाली वाटप केलेल्या भुखंडाचा विकास लवकरात लवकर होऊन उद्योगधंदे चालू व्हावेत व रोजगार निर्मिती व्हावी या हेतूने पीएपीच्या एकत्रित गटाने स्थापन केलेल्या कंपनीला ज्या व्यवसाय/उद्योगासाठी भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे, त्याच व्यवसायासाठी/उद्योगासाठी भुखंडाचा विकास करण्याच्या अटीवर तसेच अशा प्रकल्पग्रस्तांच्या गटामधील प्रकल्पग्रस्तांचे ५१ टक्के भागभांडवल प्रचलित धोरणानुसार दोन वर्षांपर्यंत कायम ठेऊन उर्वरित ४९ टक्के भागधारकांमधील काही भागाकरीता सह विकासक यांना हस्तांतरीत करुन सह विकासक नेमण्यास परवानगी दिल्यास भूखंड विकसित होऊन प्रकल्पग्रस्तांस उत्पन्नाचे साधन निर्माण होण्यास मदत होईल. या उद्देशाने अशाप्रकारे वाटप करण्यात आलेल्या भूखंडामध्ये प्रकल्पग्रस्तांना सह विकासक नेमणूक करणेबाबतचा प्रस्ताव दि. १३.१२.२०१८ रोजीच्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ५८०९ पारित करण्यात आला आहे.

सदर ठरावानुसार, प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या एकत्रित गटाने स्थापन केलेल्या कंपनीला वाटप करण्यात आलेल्या भूखंडाच्या विकासाकरीता खालील अटीवर सह विकासक (Co-developer) नेमण्यास परवानगी देण्यात येत आहे-

१. प्रकल्पग्रस्तांच्या एकत्रित गटाने स्थापन केलेल्या कंपनीला वाटप केलेल्या भूखंडाचे क्षेत्र किमान २००० चौ.मी. असणे आवश्यक आहे.

२. सह विकासक नेमणूक करताना भूखंडामधील मूळ प्रकल्पग्रस्त भागधारकांचे ५१ टक्के भागभांडवल दोन वर्षांपर्यंत कोणत्याही परिस्थितीमध्ये कमी करता येणार नाही.

३. अशा भूखंडावर सह विकासक नेमणेकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

४. सदर धोरण परिपत्रकाच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीकरीता लागू राहील.

५. कंपनीने सह विकासकासोबत करारनामा कार्यान्वीत करणे आवश्यक राहील.

६. सदर भूखंडास मुदतवाढ, हस्तांतरण, पोटभाडे, सबलीज, उत्पादनातील बदल, वापरातील बदल इत्यादी करीता महामंडळाचे प्रचलित धोरण लागू राहिल.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरी निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई